"मिशन ऑक्सिजन स्वावलंबन" अंतर्गत राज्यामध्ये नव्याने (नवीन तसेच विस्तारिकरण) "Liquid Medical Oxygen Manufacturing along with Storage and Cylinder filling facility (LMO)" प्रकल्प उभारण्याकरीता विशेष प्रोत्साहने अनुज्ञेय करणेबाबत

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : साप्रोयो २०२१/ प्र.क्र. ८२/ उद्योग-८
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक- 29 मे,२०२१

**प्रस्तावना :-**

मार्च २०२०, पासून महाराष्ट्रासहीत भारत देश कोरोना महामारीचा सामना करीत आहे. मार्च -२०२१ पासून कोरोनाची दुसरी लाट संपूर्ण देशात पसरली असुन महाराष्ट्राला त्याचा खुप मोठा फटका बसला आहे. कोरोना रुग्ण संख्या मोठया प्रमाणात वाढल्यामुळे आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न राज्य शासन करित आहे. राज्यामध्ये कोविड-१९ महामारीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे, राज्यामध्ये प्राणवायू (Medical Oxygen) ची आवश्यकता व निकड निर्माण झाली आहे. सध्यस्थितीत राज्यामध्ये एकुण १३०० मे. टन प्रति दिन प्राणवायू (LMO) निर्मिती होत आहे तथापी मागणी १८०० मे.टन आहे. सदर निर्मिती राज्यातील ३२ उद्योग घटकांमार्फत होत असुन सध्यस्थितीत राज्यामध्ये होणारी प्राणवायू (LMO) निर्मिती ही अपुरी पडत असल्याने इतर राज्यांमधून प्राणवायू (Oxygen) मागणी करुन राज्यामध्ये आवश्यक असलेला प्राणवायूचा पूरवठा (Oxygen Supply) करण्यात येत आहे. कोविड-१९ची तिसरी लाट सुध्दा ४-५ महीन्यात येण्याची शक्यता आहे आणि त्याची तिव्रता आणखी जास्त असेल असे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे भविष्यात प्राणवायू पुरवठयाची मागणी आणखी ५०० मे. टन प्रतिदिन ने वाढण्याची शक्यता असल्याने भविष्यात राज्यासाठी एकुण २३०० मे.टन प्रतिदिन प्राणवायू पुरवठयाची आवश्यकता राहील.

देशातील सध्यस्थिती पहाता प्रत्येक राज्यामध्ये प्राणवायू (LMO) ची आवश्यकता असुन महाराष्ट्र राज्यामध्ये स्वतःची प्राणवायू (LMO) ची आवश्यकता पुर्ण करण्याबाबत विविध पर्यायावर विचार करण्यात आला आहे. प्राणवायू (LMO) निर्मिती बाबत राज्य सक्षम होण्याकरिता तसेच यापुढे राज्यात प्राणवायूची कमतरता भासू नये या करीता कमीत कमी प्रतिदिन ५०० मे. टन प्राणवायू (Oxygen) निर्मिती करणारे प्रकल्प नव्याने सुरु होणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत औद्योगिकदृष्टया विकसित पुणे, रायगड इ. ठिकाणी मोठे प्रकल्प कार्यान्वित आहेत. या ठिकाणावरुन राज्यामध्ये प्राणवायू पुरवठा केला जात आहे. परंतु प्राणवायूची राज्याच्या इतर भागात वाहतुक करित असतांना बऱ्याचशा अडचणी येत असल्याने वेळेत प्राणवायू पुरवठा पोहचवला जाऊ शकत नाही. त्यामुळे राज्यातील इतर भाग जसे विदर्भ, मराठवाडा, धुळे,

नंदुरबार, रत्नागिरी व सिंधुदुर्ग अशा जिल्हयासाठी ऑक्सीजन निर्मिती (LMO) प्रकल्पांची निकड असुन त्याठिकाणी तसेच राज्याच्या इतर भागातही ऑक्सीजन निर्मिती (LMO) होणेबाबत राज्य शासनाकडून प्रयत्न सुरु आहेत. या बाबींमुळे राज्य शासन ऑक्सीजन उत्पादनासाठी स्वावलंबी होण्यास मदत होईल.

राज्याची सध्याची प्राणवायू निर्मिती क्षमता पुढील एक वर्षात ८००-१००० मे. टनाने प्रतिदिन वाढविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आकर्षक धोरण प्रस्तावित करित असतांना खालील बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

- **नविन व मोठया प्रकल्पांना प्रोत्साहन :-** राज्यात जेथे जास्त गरज आहे ,त्याठिकाणी प्राणवायू उत्पादन तातडीने वाढविण्याकरिता मोठया आणि या व्यवसायामधील उद्योगांना त्यांचे प्रकल्प आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि प्रोत्साहने.
- **प्रस्थापित उद्योगांना प्रोत्साहन :-** सद्याचे उद्योग घटक जे प्राणवायू निर्मिती करतात त्यांच्याकडून विस्तारीकरण लवकर होवून उत्पादन क्षमता वाढणार असल्यामुळे अशा घटकांना सुध्दा आर्थिक सहाय्य आणि प्रोत्साहने.

- **लघू व सुक्ष्म उद्योग घटकांना चालना :-** महाराष्ट्राची भौगोलिक तथा औद्योगिक परिस्थीती लक्षात घेता तसेच दुर्गम भागामध्ये मोठे प्रकल्प जाणार नाहीत हे लक्षात घेवून जे उद्योग घटक कमी क्षमतेने प्राणवायू उत्पादन प्रकल्प उभारतील, जे या व्यवसायामध्ये रिफिलर्स म्हणून आहेत आणि स्थानिक क्षेत्राला पूरवठा करतील अशा घटकांना विशेष प्रोत्साहने.
- **उद्योग सुलभता धोरण** (EoDB) :- या संदर्भातील सर्व प्रक्रिया तातडीने पार पाडण्यासाठी तसेच उद्योग घटकांना वेगवेगळया परवानग्या तातडीने मिळवून देण्यासाठी आणि पुढील संनियंत्रणासाठी एक समितीची स्थापना करण्यात येईल. हि समिती वेळोवेळी बैठका घेवून तथा योग्य कार्यवाही करुन याबाबतची प्रगती शासनास अवगत करेल.

कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर राज्याची प्राणवायु (Medical Oxygen) ची गरज भागविण्याच्या अनुषंगाने राज्यात जास्तीत जास्त प्राणवायुचे उत्पादन करण्याची निकड दिसुन आल्याने "मिशन ऑक्सिजन स्वावलंबन" अंतर्गत कोविड -१९ च्या संकटकालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी व आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी तसेच ऑक्सिजन उत्पादनात राज्य स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये नव्याने (नवीन तसेच विस्तारिकरण) "Oxygen Manufacturing along with Storage and Cylinder filling facility (LMO)" प्रकल्प उभारण्याकरीता विशेष प्रोत्साहने अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त वस्तूस्थिती लक्षात घेता कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर राज्याची प्राणवायु (Medical Oxygen) ची गरज भागविण्याच्या अनुषंगाने "मिशन ऑक्सिजन स्वावलंबन" अंतर्गत कोविड -१९ च्या संकटकालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी व आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी तसेच ऑक्सिजन

उत्पादनात राज्य स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये नव्याने (नवीन तसेच विस्तारिकरण) "Oxygen Manufacturing along with Storage and Cylinder filling facility (LMO)" प्रकल्प उभारण्याकरीता खालीलप्रमाणे विशेष प्रोत्साहने अनुज्ञेय करणेबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**अ) योजनेचे निकष, अटी, शर्ती व पात्रता :-**

१. MSME प्रवर्गातील रु. ५० कोटी पर्यत स्थिर भांडवली गुंतवणूक असलेले प्रकल्प यांना विशेष प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील. तसेच त्यांनी दि. ३१.०३.२०२२ पर्यंत उत्पादनात जाणे आवश्यक राहील.

२. याव्यतिरिक्त या धोरणांतर्गत २५ मे. टन प्रतिदिन पेक्षा जास्त उत्पादन क्षमता असलेले नविन तसेच अस्तित्वात असलेल्या प्राणवायू उत्पादक (LMO) घटकांमार्फत राज्यात लवकरात लवकर प्रकल्प उभारणी होऊन त्वरीत उत्पादनात जाण्याकरिता म्हणजेच दि. ३१ डिसें २०२१ पुर्वी उत्पादनात जाणाऱ्या LMO प्रकल्पांना भांडवली अनुदान देण्यात येईल. तथापि दि. ३१ डिसें २०२१ नंतर उत्पादनात जाणाऱ्या ५० मे. टन प्रतिदिन पेक्षा कमी ऑक्सिजन निर्मिती करणाऱ्या उद्योग घटकांना भांडवली अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ५० मे. टन किंवा त्यावरील प्रकल्पांना उत्पादनात जाण्याची मुदत दि. ३०.०६.२०२२ पर्यंत राहील. अशा प्रकल्पांना प्रस्तुत योजनेअंतर्गत खालील नमुद केलेली प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील. तसेच दि. ३०.०६.२०२२ नंतरच्या कालावधीत उत्पादनात जाणाऱ्या ५० मे. टन व त्यापेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्या उद्योग घटकांना भांडवली अनुदान देय राहणार नाही.

३. राज्यामध्ये स्थापित होणाऱ्या नवीन व विस्तारीत प्राणवायू (Oxygen) निर्मिती घटकांसाठी संपुर्ण राज्यातील तालुक्यांना एकच प्रवर्ग ग्राह्य धरुन प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

४. पात्र घटकांना गुंतवणूक कालावधी दि. ०१.०४.२०२१ पासून पुढील २ वर्षे राहील. तसेच दि. ०१.०४.२०२१ नंतर उत्पादनात गेलेले घटक प्रोत्साहनास पात्र राहतील.

५. पात्र गुंतवणूकदाराने प्रकल्पामध्ये गुंतवणूक सुरु करणे आणि प्रोत्साहनासाठीचा अर्ज विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई यांच्याकडे दि. ३०.०६.२०२१ पूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक/अनिवार्य राहील.

६. सदर विशेष प्रोत्साहने घटकांनी केलेल्या पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या प्रमाणात अनुज्ञेय राहिल व वार्षिक प्रोत्साहनांची मर्यादा मात्र एकूण अनुज्ञेय प्रोत्साहन रक्कम भागिले अनुदान उपभोगण्याच्या कालावधीच्या सरासरी एवढा राहिल.

| अ.क्र. | विभागजिल्हे / | पात्र गुंतवणूकीच्या कमाल टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विदर्भ, मराठवाडा, धुळे, नंदुरबार, रत्नागिरी व सिंधुदूर्ग क्षेत्रास | १५०% |
| २ | उर्वरीत इतर क्षेत्रामध्ये | १००% |

७. या योजने अंतर्गत २५ MT ते ५०MT आणि ५०MT पेक्षा जास्त LMO उत्पादन करणारे घटक प्रोत्साहनासाठी पात्र राहतील. तसेच घटकांचा औद्योगिक प्रोत्साहन अनुदान उपभोगण्याचा कालावधी अनुक्रमे ९ वर्षे (२५ MT ते ५०MT) व १२ वर्षे (५०MT पेक्षा जास्त) इतका राहील.

८. या योजने अंतर्गत MSME प्रवर्गातील रु. ५० कोटींपर्यत स्थिर भांडवली गुंतवणूक असलेल्या घटकांना प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील व त्यांचा प्रोत्साहन कालावधी ७ वर्षे इतका राहील.

९. स्थिर भांडवली गुंतवणुकीमध्ये खालील गुंतवणुक ग्राहय धरण्यात येईल .

i. Land,

ii. Building,

iii. Plant and Machinery including Manifold, LMO Transport Tankers, Cylinders for Oxygen filling and Refilling, तसेच २५ मे. टन आणि त्यावरील क्षमतेच्या ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पांची साठवणूक क्षमता ही स्थापित साठवणूक क्षमतेपेक्षा ५ पट जास्त असणे बंधनकारक राहील.

iv. Other Assests

१०. प्रकल्पाअंतर्गत विस्तारित घटकांची Forward linkage/Backward linkage बाबतची गुंतवणूक प्रोत्साहनासाठी पात्र राहील

११. घटकाने नव्या प्रकल्पासाठी अथवा विस्तारीकरणासाठी केलेल्या पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या प्रमाणात प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

१२. विस्तारीकरणांतर्गत घटकांना पात्रतेसाठी गुंतवणूकीमध्ये २५ टक्के वृद्धी आणि उत्पादन क्षमतेमध्ये २५ टक्के वृद्धी करणे बाबतचे निकष लागू राहतील.

**ब) पात्र उद्योग घटकांना पुढील प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.**

**१. स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या प्रमाणात भांडवली अनुदान ५ हफ्त्यामध्ये देय राहील.**

| अ. क्र. | विभाग /जिल्हे | उत्पादन क्षमता (MT / Day) | स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या % | कमाल मर्यादा (रक्कम रू . कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १ | विदर्भ,मराठवाडा,धुळे, नंदुरबार,रत्नागिरी व सिंधुदुर्ग क्षेत्रास | २५ MT-५०MT | २०% | रू.१०कोटी |
| | | ५०MT & above | २०% | रू.१५ कोटी |
| २ | उर्वरीत इतर क्षेत्रामध्ये | २५MT-५०MT | १०% | रू.५ कोटी |
| | | ५०MT & above | १०% | रू.१० कोटी |

२. औद्योगिक विकास अनुदान राज्यात होणाऱ्या प्रथम विक्रीच्या १०० टक्के ढोबळ राज्य, वस्तु व सेवा करावर (Gross Base) देय राहील.

३. **मुद्रांक शुल्क माफी** - गुंतवणुक कालावधीतील भुखंड खरेदी, भाडेपट्टा, बँकेचे दिर्घ मुदतीचे कर्ज गहाण खत इत्यादी सर्व प्रयोजनार्थ अनुज्ञेय राहील.

४. **विद्युत शुल्क माफी** - अनुज्ञेय प्रोत्साहन कालावधीप्रमाणे

५. **विद्युत दर अनुदान** - रु. २ प्रतियुनिट ५ वर्षांसाठी अनुज्ञेय राहील व हे अनुदान Annual Cap मध्ये समाविष्ठ राहणार नाही .

६. **५ टक्के व्याज अनुदान** - MSME प्रवर्गातील रु. ५० कोटींपर्यंत असलेल्या प्रकल्पामधील स्थिर मालमत्ता खरेदी साठी बँकेकडून / सार्वजनिक वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या मुदत कर्जावर व्याज अनुदान पात्र राहील. (सदरची व्याजदर सवलत हि घटकाने आर्थिक वर्षात भरलेल्या विद्युत देयकाच्या दुपटीच्या मर्यादेत राहील.)

७. वार्षिक देय औद्योगिक प्रोत्साहन अनुदान दाव्यामधून इतर प्रोत्साहने वजावट करण्यात येणार नाहीत. परंतू प्रोत्साहने हि प्रतिवर्ष अनुज्ञेय (Annual Cap) मर्यादेतच वाटप करण्यात येतील.

८. नवीन किंवा विस्तारीकरणा अंतर्गत स्थापन होणारे सिलेंडर उत्पादन घटक जे दि. ३१.१२.२०२१ पूर्वी उत्पादनात जातील अशा घटकांना प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

**२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रामध्ये स्थापित होणाऱ्या घटकांना खालील प्रमाणे अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात येतील.**

I. मऔविम मार्फत प्राणवायू उत्पादक (LMO) घटकांना भुखंडाचे वाटप सरळ पध्दतीने प्राधान्य सदराखाली करण्यात येईल.

II. विदर्भ, मराठवाडा, धुळे, नंदुरबार, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील मऔविम क्षेत्रामध्ये स्थापित होणाऱ्या घटकांना प्राधान्याने भु-खंड वाटप करतांना प्रचलित दरामध्ये ५० टक्के सुट देण्यात येईल तसेच या व्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रामध्ये प्रचलित दरात २५ टक्के सुट देण्यात येईल.

III. मऔविम क्षेत्रामध्ये स्थापित होणाऱ्या घटकांना हफ्त्याने रक्कम भरण्यास अनुज्ञेय करण्यात येणार असून पहिल्या हफ्त्यामध्ये भूखंडाच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम भरणा केल्यानंतर भूखंडाचा ताबा देण्यात येणार असून उर्वरित रक्कम ४ हफ्त्यांमध्ये २ वर्षाच्या कालावधीमध्ये भरणा करणे अनुज्ञये राहील.

IV. सदरहु धोरण दि. ३१ डिसेंबर २०२१ पर्यत लागु राहील.

**३) उद्योग सुलभता धोरण :-**

राज्यामध्ये प्राणवायू निर्मिती (LMO) उत्पादन प्रकल्पाची गुंतवणुक त्वरीत कार्यान्वित होणेसाठी घटक स्थापित करण्यासाठी लागणारे सर्व परवाने / नाहरकत प्रमाणपत्रे मिळणेसाठी सदर घटकांना एक खिडकी योजनेंतर्गत एकत्रित परवानगी १५ दिवसांमध्ये देण्यात येईल. सदर परवानगीच्या अनुषंगाने घटकामार्फत घटक स्थापनेची सर्व कामे त्वरीत सुरु करणेस मान्यता राहील दरम्यानच्या कालावधीत घटकांस मैत्री कक्षातर्फे विविध खात्यामार्फत परवानगी / ना-हरकत प्रमाणपत्रे मिळणेसाठी समन्वय सेवा प्रदान केली जाईल. सदर बाबींची अंमलबजावणी जलद गतीने होणेसाठी विकास आयुक्त (उद्योग) यांचे अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत केली जाईल. सदर समितीची मुदत ही प्रस्तुत धोरणाच्या कालावधी पर्यंत राहील.

**संनियंत्रण समितीची संरचना खालीलप्रमाणे असेल :-**

| | | |
|---|---|---|
| १. विकास आयुक्त (उद्योग) | -: | अध्यक्ष |
| २. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण | -: | सदस्य |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम | -: | सदस्य |
| ४. आयुक्त ,अन्न व औषध प्रशासन | -: | सदस्य |
| ५. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ | -: | सदस्य |
| ६. संचालक , औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | -: | सदस्य |
| ७. उद्योग सह संचालक, उद्योग संचालनालय | -: | सदस्य सचिव |

अपर मुख्य सचिव (उद्योग) यांचेमार्फत उपरोक्त समितीने केलेल्या कामकाजाचा आढावा दर १५ दिवसांनी घेण्यात येईल.

उपरोक्त नमूद बाबींकरीता येणारा खर्च मागणी क्र. के-७, २८५२, उद्योग-८० सर्वसाधारण १०२ औद्योगिक उत्पादकता (००) (०१) सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रोत्साहने (२८५२०४३४) (योजनेतर) (दत्त मत) या लेखाशिर्षाखाली प्रतिवर्षी प्राप्त निधीतून करण्यात येईल.

सदर शासन निर्णय मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने तसेच वित्त विभागाच अनौपचारिक संदर्भ क्र. १३१/ व्यय-११, दि. २१.०५.२०२१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा सांकेतांक क्र. ------------------------असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

( अनिलकुमार रा. उगले )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव (५ प्रत्र)
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव (५ प्रती)
३. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव (५ प्रती)
४. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक
५. मा.विरोधी पक्षनेता ,विधान परिषद / विधान सभा ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,मुंबई यांचे खाजगी सचिव.
६. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य
७. मुख्य सचिवांचे यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव ,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय ,विधान भवन, मुंबई

१०.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग ,मुंबई
११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ,मुंबई (५ प्रती)
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
१३.विकास आयुक्त उद्योग, उद्योग संचालनालय, मुंबई
१४.व्यवस्थापकीस संचालक, महावितण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५.आयुक्त ,अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६.सदस्य सचिवमहाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ , मुंबई
१७.संचालक ,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, मुंबई
१८. उद्योग सहसंचालकउद्योग संचालनालय ,, मुंबई
१९.मैत्री कक्ष, मुंबई
२०.वित्त विभाग (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई.
२१.आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२.वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे, मंत्रालय, मुंबई
२३.उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
२४.उद्योग विभागातील सर्व सह/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
२५.निवड नस्ती.